AC-B
७७

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नाशिक शहर **P.S.(ठाणे):** म्हसरूळ पोलीस स्टेशन **Year (वर्ष):** 2021

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0110 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2021 15:41 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

   1 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ 7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 31/07/2021

      **Time Period (कालावधी):** पहर 3 **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/07/2021

      **Time From (वेळेपासून):** 09:45 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 09:45 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 31/07/2021 **Time (वेळ):** 21:18 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

   **Entry No. (नोंद क्र.):** 020 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/07/2021 21:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी

   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** आग्रा लिंक रोड,अंबिका सुपर मार्केट समोर,पंचवटी नाशिक

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** म्हसरूळ पोलीस स्टेशन

   **District(State) (जिल्हा(राज्य)):** नाशिक शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** विकास रामजी राठोड

   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   **ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

   | S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
   |---|---|---|
   | 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शासकिय माध्यमिक आश्रमशाळा,पिंपरखेड ता दिंडोरी जि नाशिक,म्हसरूळ पोलीस स्टेशन, नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शासकिय माध्यमिक आश्रमशाळा,पिंपरखेड ता दिंडोरी जि नाशिक,म्हसरूळ पोलीस स्टेशन, नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7796112108

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र दामु कळसाईत | | | 1. आग्रा लिंक रोड,ईश्वरी हौसींग सोसायटी,माने नगर, पंचवटी, नाशिक , म्हसरूळ पोलीस स्टेशन,नाशिक शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 लाच स्वीकारली | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री. विकास रामजी राठोड वय - 35 वर्ष , व्यवसाय- नोकरी, अधीक्षक , शासकिय माध्यमिक आश्रमशाळा पिंपरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक रा. हल्ली मु. पिंपरखेड शासकिय माध्यमिक आश्रमशाळा ता. दिंडोरी जि. नाशिक मुळ राहणार - टेंभी तांडा ता. किनवट जि. नांदेड मो. नं. 7796112108समक्ष पोलीस स्टेशनमध्ये हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील पत्त्यावर राहत असून शासकिय माध्यमिक आश्रमशाळा येथे अधीक्षक म्हणुन नोकरीस आहे. आठ नउ दिवसापुर्वी शासकिय माध्यमिक आश्रमशाळा पिंपरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक येथील मुख्याध्यापक श्री. राजेंद्र दामु कळसाईत यांनी मला सांगितले कि, तुझे सातव्या वेतन आयोगानुसार फरकाचे बील मी तुला काढुन देतो. सदर बील तुझ्या खात्यावर जमा झाल्यावर मला काहीतरी द्यावे लागतील. मला मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेसाठी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाषिक येथे फोन करून पोनि.श्रीमती भाये- बेलगांवकर यांचेकडे तोंडी तक्रार सांगीतली. मी पोनि.श्रीमती भोये- बेलगांवकर यांना दिनांक 30/07/2021 रोजी दिंडोरी रोडवरील राज स्वीट येथे भेटण्यास बोलावीले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कडील पोनि श्रीमती भोये- बेलगांवकर हे त्यांचे स्टाफसह ठरलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी मला त्यांचे गाडीत बसवुन घेतले असता मी मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांचे विरूध्द असलेली माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून दिली.मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे पो.निरीक्षक श्रीमती. भोये- बेलगांवकर यांनी मुख्याध्यापक श्री. कळसाईत हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे ? याची पडताळणी करणेसाठी माझेसोबत पंच श्री.पवार यांना दिले. माझेजवळ व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करून देवून मला मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांचे भेटीसाठी राज स्विट, दिंडोरी रोड, नाशिक येथुन सर्व सापळा पथक हे मला घेवुन मुख्याध्यापक यांचे घर असलेल्या मेरी - रासबिहारी रोडवरील मानेनगर येथील साई श्रद्धा पेट्रोलपंपाजवळ थांबले. तेथून लोकसेवक श्री.कलसाईत यांचे घरी त्यांचे भेटीकरीता मी व पंच श्री. पवार असे पायी चालत गेलो. तेथे माझे पंचासमक्ष मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांचेशी झालेल्या संभाषणा दरम्यान श्री.कलसाईत मला म्हणाले की, सहा सांगितले होते ना हं. पाच देवून टाका असं करतो काम भाऊ किती कमीची अपेक्षा आहे तुला. अशाप्रकारे मुख्याध्यापक कळसाईत यांनी माझेकडे तडजोडीअंती 5,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. दि.31/07/2021 रोजी मी आपले कार्यालयात आलो असता पोनि श्रीमती भोये- बेलगांवकर यांनी मला लाच म्हणुन देणेसाठी लागणारी रक्कम हजर करण्यास सांगितली असता मी रुपये 5000/- हजर केले त्यात 500 रुपयाच्या सहा, 200 रुपयाच्या आठ व 100 रुपयाच्या चार नोटा हजर केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती. भोये- बेलगांवकर यांनी सापळा पथकातील सदस्याकरवी

C9



अन्थ्रासीन पावडर बाबत प्रात्याक्षीक दाखवून त्या रकमेस अंथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पन्टीचे पुढील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर मी मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांना फोन केला असता त्यांनी मला मेरी- रासबिहारी लिंक रोडवरील साई श्रध्दा पेट्रोल पंपाजवळ भेटण्यास सांगितले. त्यावेळी पोनि श्रीमती भोये- बेलगांवकर यांनी सुचना दिल्या तसेच मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांनी लाच स्विकारल्यास डोक्यास असलेली टोपी काढून इशारा करणे बाबत सर्वासमक्ष सांगितले. त्यानंतर पोनि पाटील यांचे वाहनाने रवाना होउन मेरी लिंक रोडवरील गायत्रीनगर च्या बोर्ड जवळ पोनि पाटील यांनी त्यांचे वाहन थांबवीले व त्यांचे पाठोपाठ पोहवा मोरे व पोना बाविस्कर यांनी दुचाकी थांबवीली. त्यावेळी पोनि भोये- बेलगांवकर यांनी पंच श्री. पवार यांना गाडीतून उतरण्यास सांगून, पोहवा मोरे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हईस रेकॉडर चालू करून तक्रारदार यांच्या शर्टाच्या डावीकडील खिषात ठेवुन दिले. त्यानंतर तेथुन मला व पंच श्री. पवार यांना दुचाकी देवुन मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांचे भेटीकरीता रवाना केले. त्यानंतर माझी व मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांची श्रद्धा पेट्रोलपंपजवळील अंबिका सुपर मार्केटचे जवळ भेट होउन व कामासंबंधी बोलणे होउन लाच म्हणून मागितलेले 5,000/- रू. त्यांना दिले असता त्यांनी ते स्विकारून त्यांचे पन्टचे खिश्यामध्ये ठेवले. मी मुख्याध्यापक श्री. कळसाईत यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा पोनि श्रीमती भोये- बेलगांवकर यांनी त्यांचे सहकारीसह तेथे येउन श्री. कळसाईत यांना रंगेहाथ पकडले.पोनि श्रीमती बेलगांवकर यांनी त्यांना त्यांचे नांव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव श्री.राजेंद्र दामु कळसाईत, वय 51 वर्ष, मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा , पिंपरखेड, ता.दिंडोरी, जि.नाषिक, राहणार ईश्वरी हौसींग सोसायटी, प्लट नं.09, मेरी आग्रा लिंक रो, माने नगर, पंचवटी, नाशिक असे सांगितले. त्यानंतर त्यांचेविरूध्द यशस्वी लाचेच्या सापळा कारवाई बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तरी दि.31/07/2021 रोजी 09.45 वा. श्री. कळसाईत यांनी मेरी - रासबिहारी रोडवरील अंबिका सुपर मार्केट समोर माझे सातव्या वेतन आयोगाप्रमाणे फरक काढुन दिला त्याचे बक्षिस म्हणुन माझेकडे 6,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 5,000/- लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम मेरी - रासबिहारी लिंक रोड वरील श्रद्धा पेट्रोलपंपजवळील अंबिका सुपर मार्केटचे समोर पंचसाक्षीदार यांचे समक्ष स्विकारली.
अशाप्रकारे श्री.राजेंद्र दामु कळसाईत, वय 51 वर्षे, मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा , पिंपरखेड, ता.दिंडोरी, जि.नाशिक, राहणार ईश्वरी हौसींग सोसायटी, प्लट नं.09, मेरी आग्रा लिंक रोड, माने नगर, पंचवटी, नाशिक यांनी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने कायदेशिर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोशण म्हणुन लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): pandharinath raghunath dhokane(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

HC 1462

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): pandharinath raghunath dhok

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
म्हसरुळ पोलीस स्टेशन, नाशिक

पोलीस निरीक्षक, म्हसरुळ पोलीस ठाणे
सत्यमेव जयते
नाशिक शहर (म.रा.)

C3

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)